

# किल्ले सोंडाई

चंद्रशेखर सावंत



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# किल्ले सोंडाई

(दुर्गदर्शन)

लेखक : चंद्रशेखर सावंत

# किल्ले सोंडाई

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# किल्ले सोंडाई

लेखक : चंद्रशेखर सावंत

शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-९०२, ए-विंग, ए-१, ९ वा मजला,

वेस्टर्न एक्सप्रेस हायवे च्या जवळ, शांताराम तलाव,

मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

भ्रमणध्वनी : +९१ ९९३०५६०४५८

ब्लॉग : cnsawant.blogspot.in

ईमेल : shekharsawant1111@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १५ ऑगस्ट २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**अर्पण पत्रिका**

निर्विवाद सिंहपुरूष व ज्यांचे नाव कानावर येताच

छाती अभिमानाने फुलवणाऱ्या

हिंदवी स्वराज्य संस्थापक

छत्रपती शिवाजी महाराज

यांच्या चरणी कृतज्ञतापुर्वक अर्पण

--/ चंद्रशेखर सावंत

## स्वपरिचय

**नाव :** चंद्रशेखर सावंत

**टोपणनाव :** शेखर किंवा विकी

**गाव :** नांदवी, जिल्हा : रायगड ४०२ १०३

**राहण्याचा पत्ता :** शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-९०२, ए-विंग, ए-१, ९ वा मजला,

वेस्टर्न एक्सप्रेस हायवे च्या जवळ, शांताराम तलाव,

मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

**भ्रमणध्वनी :** +९१ ९९३०५६०४५८


**ब्लॉग :** cnsawant.blogspot.in


**ईमेल :** shekharsawant1111@gmail.com

**छंद :** ट्रेकिंग, ट्रॅव्हल आणि लिखाण


# किल्ले सोंडाई








## मुंबई येथून सोंडाई गडावर पोहोचण्यासाठी नकाशा




## पुणे येथून सोंडाई गडावर पोहोचण्यासाठी नकाशा

ट्रेक हा आयुष्यातला असा भाग आहे कि तो नवचैतन्य घेऊन येतो. रोजच्याच धकाधकीच्या वातावरणा पेक्षा रविवारी सुट्टीच्या निमित्ताने, स्वतःसाठी आयुष्यात उमंग येण्यासाठी काहीतरी खास असावे आणि त्यानिमित्ताने आयुष्यात नवनवीन गोष्टी शिकायला व बघायला मिळतात, ह्या अनुषंगाने ट्रेक हा तर करायचाच.

पावसाळ्याचा ॠतू सुरू झाला की वेड लागतात ते भटकंतीचे. हिरवेगार झालेले डोंगर गिर्यारोहकांना खुणावत असतात. ट्रेक करणं हा माझा अगदी जिव्हाळयाचा विषय बनला आहे. पाठीवर बॅग लादायची आणि निघायचं ट्रेक ला. रोशन जंगम मुळे मी 'फोर्ट रायडर्स' या विशेष गिर्यारोहण समूहाशी जोडलो गेलो. यंदा नुकतेच केलेले 'सोंडाई ट्रेक' हे फोर्ट रायडर्स बरोबरचे दुसरे ट्रेक असल्यामुळे, माझ्या आयुष्यातील पहिले प्रवासवर्णनीय पुस्तक फोर्ट रायडर्स यांना पुष्पहार म्हणून भेट.



आयोजन केलेल्या ट्रेक ला अनुसरून WhatsApp Group चे नाव बदलले मग असं वाटतं कधी तो दिवस येतो आणि कधी ह्या मुंबई च्या वैफल्यग्रस्त वातावरणातून स्वतःसाठी वेळ देता येईल. २१ जुलै २०१९ रोजी नुकतेच आम्ही ४१ जणांनी रायगड जिल्ह्यातील 'सोंडाई ट्रेक' केले. माझं ठरल्याप्रमाणे सकाळी ०४.३० ला घरातून निघून ०६.२४ च्या कर्जत ट्रेन साठी दादर ला पोहोचलो. जयेश ने WhatsApp Group वर सांगूनच ठेवलेले कि कर्जत च्या बाजूने ५ वा डब्बा सगळयांनी पकडा, त्यामुळे प्रत्येकासाठी जास्त शोधाशोध झाली नाही. जयेश, प्राजक्ता, प्रथमेश, स्वप्नील, सार्थक, रोशन, सागर इत्या. मित्र स्टेशन नुसार भेटत गेले व ट्रेनमध्येच आम्ही गाण्यांच्या भेंड्या खेळायला सुरुवात केली. मला जास्त काही गाणी येत नसल्यामुळे कोरस द्यायायला मी होतो. नेरळ-भिवपुरी-कर्जत हे निसर्गाच्या सानिध्यात मनसोक्त आनंद घेणाऱ्यांसाठी तसेच गिर्यारोहकांसाठी आवडती गावे आहेत. दादर येथून फ्लॅटफॉर्म नंबर ०४ वरून निघणाऱ्या कर्जत साठी ट्रेन मधल्या माणसांची गर्दी म्हणजे Western Line मध्ये विरार-चर्चगेट असे म्हणायला काय हरकत नाही. ०८.०५ ला आम्ही कर्जत स्टेशन ला पोहोचलो. पुढे सर्वांच्या भेटीगाठी व पुण्यावरून येणाऱ्या मित्र मंडळींसाठी वाट बघत होतो ते सुद्धा 'सिंहगड एक्सप्रेस' ने थोड्याच वेळेत तेथे रवाना झाले. पुढे बाहेर आल्यावर एक चहा चा सुरका मारल्यावर आयोजकांनी पूर्वनियोजित गाड्यांची व्यवस्था केलेली, म्हणून सकाळी ०९.२० ला आम्ही सोंडाई च्या ठिकाणी जाण्यासाठी सज्ज झालो.



**सर्वांसाठी घेतलेला चहाचा सुरका**
**ट्रेकच्या अगोदरचे पहिले समाधान**

वाटेतच धरण आणि सभोवतालच्या परिसरात निसर्गाने पांघरलेली हिरवी शाल ही मनाला फार आकर्षक करीत होती. पुढे ०९.55 वाजता आम्ही गडाच्या पायथ्याशी येऊन पोहोचलो. ट्रेकिंग च्या सुरवातीस आयोजक मयूर दादाने ने गडासंबंधित माहिती दिली, या किल्ल्याचा विस्तार पाहता याचा उपयोग टेहळणीसाठी होत असावा. मयूर दादाने ट्रेकिंग चे नियम सांगितले, तसेच चंदू दादाचे कौशल्य म्हणजे त्याने मराठी, कन्नड व बंजारा या तिन्ही भाषेत समुहासाठी पाळायचे नियम त्याच्या वक्तव्यातून स्पष्ट केले व पुढे सर्वांनी स्वतःबद्दल माहिती म्हणजेच नाव व राहण्याचे ठिकाण हे सांगितल्यावर आम्ही ट्रेक साठी सज्ज झालो.




## गडावर पोहोचण्यासाठी लावण्यात आलेले दिशादर्शक

सोंडेवाडी व वावर्ले ही दोन किल्ल्याच्या पायथ्याशी गावे आहेत. सोंडेवाडी गाव किल्ल्याच्या (१/४) उंचीवर आहे. या गावातून एक वाट किल्ल्यावर जाते. या वाटेने १५ मिनिटात आपण एका पठारावर पोहोचतो. बरेच निसर्गप्रेमी गिर्यारोहक आल्यामुळे आम्ही लवकर वर पोहोचायची काय घाई केली नाही. ट्रेक होत होताच थोड्या वेळात एका प्रशस्त ठिकाणी न्याहरी म्हणून, चायनीज भेळ चा आस्वाद फार मजेशीर होता. आयोजकांचे व्यवस्थापन चोख असल्यामुळे कुठच्याही बाबतीत कसलीच तारांबळ उडाली नाही.




फोर्ट रायडर्स ने
ट्रेकिंग ला सुरुवात
केल्यावर



निसर्गाच्या सान्निध्यात सकाळी न्याहरी च्या वेळी प्राजक्ताने
टिपलेलं सुंदर छायाचित्र

## ट्रेक करत असताना चंद्रू दादाने नकळत टिपलेली छायाचित्र









डावीकडून: सुचित्रा, चंद्रू दादा, प्राजक्ता आणि मी



मी, इतेश आणि रोशन

हे सर्व आटपल्यावर आम्ही पुढच्या प्रवासास सज्ज झालो. गड चढताना पाऊस पडावा अशी सर्वांचीच इच्छा होती पण वरूण राजा काय आला नाही. त्यात निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी इतर ट्रेकचे समूह पण आले होते, त्यामुळे जास्त घाई करून ट्रेक पूर्ण करायच्या भानगडीत पडलो नाही. वर सुळक्याच्या ठिकाणी पोहोचायच्या अगोदर कातळात कोरलेले पाणी साठे व लोखंडी शिड्यांचे पॅच लागतात.



**कातळात खोदलेली पाण्याची दोन जोडटाकं**

गडमाथ्यावरून माथेरानचा डोंगर, इर्शालगड, प्रबळगड, मोरबे धरण, वावर्ले धरण व आजूबाजूचा विस्तिर्ण परिसर दिसतो. तेथूनच पाठच्या बाजूला पहिले तर मोर्बे धरण मनाला आकर्षित करत आहे. लोखंडी शिड्यांचे पॅच पूर्ण करून आम्ही वर सुळक्याच्या ठिकाणी पोहोचलो व सोंडाई मातेचे दर्शन घेतले.



**किल्ल्यावरून मन आकर्षित करून घेणारे धरण**



**सोंडाई मातेचे दर्शन**




**गडाच्या माथ्याशी असलेला लोखंडी शिडीचा पॅच**

तेथे थोडा वेळ फोटोसेशन वैगरे करून आणि स्वप्नील दादा ने शिववंदना दिली. स्वप्निल दादाने दिलेली शिववंदना म्हणजे नसानसात वाढत जाणारं सळसळतं रक्त, हे सर्व झाल्यावर आम्ही लगेच परतीच्या प्रवासास निघालो.



**फोर्ट रायडर्स समूह समन्वयेत स्वप्नीलदादाने शिववंदना दिल्यानंतरचा क्षण**

उतरताना पाऊस आणि हवा या दोनही गोष्टी दुर्दैवाने नाही मिळाल्या किंवा एखादा छोटासा धबधबा सुद्धा नाही मिळाला, बॅगेत असलेले पाणी सुद्धा संपलेले. कदाचित, निसर्गाने आमची परिक्षा घ्यायायचे ठरवले असावे. उलट रखरखतं ऊन होतं. यातून आम्ही सावलीचा आसरा घेत ५-१० मिनिनांसाठी २ ठिकाणी थांबलो. पुढे पूर्ण गड उतरल्यावर धरणात उतरायचे म्हणून आम्ही पोखरवाडी मार्गे गाठत होतो. रख रखते ऊन अंगाला फार झोंबत होते. थोड्याश्या राहिलेल्या पाण्यात इलेक्ट्रल व ग्लुकॉन-डी घेऊन आम्ही वेळ काढत होतो, त्यातही आम्ही परत २ ठिकाणी ५-१० मिनिटांसाठी मुक्काम केला आणि धरणाच्या दिशेला पोहोचताच वाटेत एक गाव लागले.

सार्थक आणि स्वप्नील बाजूलाच होते, त्यात सार्थक म्हणाला चल जरा शुद्ध पाण्यासाठी गावात जाऊन येऊ आणि फक्त आम्ही तिघे म्हणजेच मी, स्वप्नील आणि सार्थक गावाच्या दिशेने वळू लागलो. गाव तसे मुख्य रस्त्यालगत पासून आतमध्येच होते, तरी सुद्धा आम्ही तिथे जाण्याचे ठरवले. घरे चालू होताच एका घरामध्ये ६-७ बालगडी भेटले आणि आम्ही त्यांना विचारले, बाळा जरा पाणी मिळेल का रे..  ते ही अगदी त्यांच्या प्रेमळ स्वभावाने ते घेऊन आले, वरून ते स्वतःहून म्हणाले कि तुमच्या पाण्याच्या पाण्याच्या बाटल्या आम्ही भरून देतो म्हणून.. पाणी पिताच मी ५-७ मिनिटे परत तिथे आराम केला आणि एक जबरदस्त मानसिक व शारीरिक आधार वाटू लागला. लहान मुले हि देवाघरची फुले हे उगाच नाही म्हटले आहे, खूप काही साम्य आहे त्यात. पुढे त्यांनी धरणाच्या दिशेला जाणारा मार्ग हि सांगितला, व थोड्या अंतरावर आम्हाला पुढे सोडायला ही आले.



**बाळगड्यांबरोबर चा प्रेमळ क्षण**

पुढे निघताच वरूण राजाने हजेरी लावली आणि संपूर्ण वैफल्यग्रस्त झालेला टाळका हा जसाकाय पुन्हा समोर जर नवीन एका ट्रेकचं आव्हान आलं तर ते करण्यासाठीही सज्ज होता, पुढे मोर्बे धरण लागताच शूज आणि बॅग काढून फटाफट धरणात जायायला सुरुवात केली आणि एक वेगळाच मानसिक आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर उमटत होता.



**साचलेल्या पाण्यात थंडाव्यासाठी आनंद घेत असलेल्या म्हैशी**

# मोर्बे धरणातील आनंददायी क्षण









अर्धा-पाऊण तास धरणाच्या थंड पाण्यात मनसोक्त आनंद घेतल्यावर आम्ही सर्वांनी जेवायला सुरूवात केली. जेवणात चनामसाला, तिळकुट, चटणी, लोणचं, चपात्या, व प्रथमेश ने आणलेली बटाट्याची भाजी ह्या सर्वांत कांद्याची सोबत हे सर्व फार चविष्ट होतं. सर्व मित्र समुहाबरोबर बाजुबाजूला बसून गप्पा मारणं व समोर धरणातील पाण्याच्या लहरींचा नजारा. वा... असे चैतन्यमय वातावरण होते. सोबतच कल्पेश ने २ लिटर च्या बाटली मध्ये अस्सल घरगुती बनावटीचा ताक आणलेला. ताक पियाल्यानंतर एक जबरदस्त मानसिक समाधान वाटू लागले.  हे सर्व होत होता थोड्याच वेळात आम्ही परतीच्या प्रवासास सुरूवात केली.



## दुपारी जेवणानंतर टिपलेलं छायाचित्र

आयोजक मयूर दादा व जयेश यांनी फार चांगल्या प्रकारे आयोजन केले, सर्व सहकारी मित्रमंडळी यांचा हातभार सर्वच ठिकाणी होता. चहा-न्याहरी पासून ते दुपारच्या जेवणापर्यंत सर्व काही एकदम झक्कास होते. पुढे परत खाजगी वाहनातून कर्जत स्टेशन ला आल्यावर दमल्यासारखे मुळीच वाटत नव्हते.. येताना मी पुढे रोशन बरोबर घाटकोपर ला उतरलो कारण घाटकोपर ते अंधेरी असा मला मेट्रो चा प्रवास करायचा होता. प्रत्येक जण स्टेशन नुसार उतरताना एकच वाक्य म्हणायचा 'Next Trek' ला भेटू!

***चला तर मग आता नक्कीच भेटू Next Trek ला...***

**गडावर पोहोचण्याच्या वाटा :**

सोंडाई किल्ल्यावर जाण्यासाठी २ वाटा आहेत.

**१) सोंडेवाडी मार्गे :-**

कर्जत रेल्वे स्थानकावर उतरून कल्याणच्या दिशेने जाऊन पूर्वेला बाहेर पडावे. येथून रिक्षाने ९ किमी वरील सोंडेवाडीला जाता येते किंवा कर्जत -चौक मार्गावर धावणाऱ्या सहा आसनी रिक्षा, एसटीने ६ किमीवरील बोरगाव फाट्यावर उतरावे. येथून मोरबे धरणाच्या जलाशयाच्या बाजूने जाणाऱ्या रस्त्याने ४ किमी वरील सोंडेवाडी पर्यंत चालत जावे. सोंडेवाडीतून गडावर जाण्यास १ ते १.५ तास लागतो.

**२) वावर्ले मार्गे :-** कर्जत रेल्वे स्थानकावर उतरून कल्याणच्या दिशेने जाऊन पूर्वेला बाहेर पडावे. येथून रिक्षाने ४ किमी वरील वावर्ले गावाच्या फाट्या पर्यंत जाण्यासाठी कर्जत - चौक मार्गावर धावणाऱ्या सहा आसनी रिक्षा, एसटी आहेत. फाट्यावर असलेल्या कमानी खालून जाणारा रस्ता गावातून, गावामागील वावर्ले धरणापर्यंत जातो. येथे पोहोचण्यास अर्धा तास लागतो. धरणा जवळून समोर सोंडाई किल्ला दिसतो. धरणाच्या भिंतीच्या उजव्या बाजूने जाणारी पायवाट टेकडी वरील वावर्ले ठाकरवाडीत जाते. ठाकरवाडी ओलांडून टेकडी उतरल्यावर एक छोटा ओढा पार करावा लागतो. ओढ्याच्या पुढे सोंडाई किल्ल्याच्या चढाला सुरुवात होते. साधारणत: १५ मिनिटात आपण पठारावर पोहोचतो. येथे सोंडेवाडीतून गडावर जाणारी वाट येऊन मिळते. पुढे गडावर जाण्यासाठीच्या रस्त्याचे वर्णन वर दिल्या प्रमाणे आहे.

या वाटेने नोव्हेबर - डिसेंबर नंतर गडावर जातांना वावर्ले धरणापासून ठाकरवाडीची टेकडी न चढता धरणाच्या जलाशयाच्या मागे असलेल्या ओढ्यातून चालत जावे. त्यामूळे टेकडी चढण्या - उतरण्याचा वेळ वाचतो. वावर्ले गावातून गडावर जाण्यास २ ते ३ तास लागतात.

वावर्ले गावातून जाणारी वाट ही सोंडेवाडीतून गडावर येणाऱ्या वाटेपेक्षा कठीण व वेळ खाणारी आहे.

स्वत:च्या वहानाने येणाऱ्यांनी मुंबई - पनवेल मार्गे चौक गाठावे. चौक - कर्जत मार्गावर बोरगाव फाटा चौक पासून ६ किमी अंतरावर तर वावर्ले फाटा ८ किमी अंतरावर आहे.

**राहाण्याची सोय :**

गडावर रहाण्याची सोय नाही, पण वावर्ले ठाकरवाडीतील व सोंडेवाडीतील शाळेत राहण्याची सोय होते.

**जेवणाची सोय :**

गडावर जेवणाची सोय नाही, पण कर्जत गावात जेवणाची सोय होऊ शकेल.

**पाण्याची सोय :**

गडावर पिण्याच्या पाण्याची सोय आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ :

सोंडेवाडीतून गडावर जाण्यास १ तास लागतो. वावर्ले गावातून गडावर जाण्यास २ ते ३ तास लागतात.

**उंची :**

१२०० फूट (३६५ मीटर)

**बाईक किंवा कार ने यायायचे झाल्यास** सोंडाई गडावर पोहोचण्यासाठी मुंबई येथून मार्ग

मुंबई-कल्याण-कर्जत-बोरगावफाटा -सोंडेवाडी

**ट्रेन ने यायचे झाल्यास**

सोंडाई गडावर पोहोचण्यासाठी मुंबई येथून मार्ग

दादर येथून प्लॅटफॉर्म क्रमांक ०४ वरून कर्जत ला जाणारी सकाळी ०६.२४ ची ट्रेन पकडावी.

कर्जत ला पोहोचल्यावर बोरगाव फाटा येथे उतरण्यासाठी टमटम आहेत

(कर्जत येथून खाजगी वाहनांचे नियोजन केले तर अती उत्तम)

**ट्रेकसाठी लागणारा ब्रेकफास्ट व दुपारच्या जेवणासहित लागणारा कमीत कमी खर्च**

रुपये ३००/-

आणि जास्तीत जास्त करू  तेवढा कमी.

*चला तर मग निसर्गाच्या सानिध्यात*

*आयुष्य चैतन्यमय करण्यासाठी*

*अर्थातच ट्रेक साठी तयार व्हा...*

*--/ चंद्रशेखर सावंत*

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने, पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची तेरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची,डॉ. स्मिता दामले यांची पाच, डॉ. वृषाली जोशी यांची तीन अशा

अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक “स्वांतःसुखाय” लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या “साहित्यरत्नांचिया खाणीं” मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, सूरज गाताडे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत

अध्यक्ष, ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com
esahity@gmail.com